# प्रकरण तिसरे

## प्रेमकवी भा. रा. तांबे

## प्रेमकवी भा.रा.तांबे

भास्करराव तांबे स्वत:च आपल्या कवितेचे वैशिष्टय सांगतात की, ही कविता त्यांच्या जीवनाच्या संगतीने वाढलेली आहे. [ इट हॅज ग्रोन वुइथ माय लाईफ ] मायदेवांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी तसा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. माधवराव पटवर्धनांनीही तांब्यांच्या भावकविता म्हणजे जीवनलहरी आहेत असेच म्हटलेले आहे.[१] तांब्यांच्या कवितेची वाढ आणि विकास त्यांच्या जीवनाच्या साथसोबतीने झालेला असल्यामुळे त्यांच्या चरित्राची थोडी ओळख करुन घेणे आवश्यक आहे.

## तांबे यांचे जीवनचरित्र -

तांबे यांचा जन्म झाशी जवळच्या मुंगावली या लहान गावात २७ आक्टोबर १८७३ रोजी झाला. त्यांचे वडील रामचंद्र गंगाधर हे तेथे सुभायतीत कारकून होते. तांब्यांच्या मातेचे नाव यमुनाबाई. आपल्या मुलाचा " प्रतिभा संपन्न, रससिध्द कवी " म्हणून महाराष्ट्रात झालेला गौरव पाहण्याचे भाग्य या मातेला लाभलेले होते. तांब्यांचा जन्म मुंगावलीला झाला तरी तेथे शिक्षणाची सोय मुळीच नव्हती. त्यांना शिक्षणासाठी झाशीला जावे लागले. तेथे आपल्या पणजोळी पुसाळकरांच्या घरच्या शाळेत भास्कररावांनी आपल्या शिक्षणाचे प्राथमिक धडे गिरविले. या शाळेतच त्यांच्या मोडी आणि बाळबोध अक्षराला मोत्यासारखे वळण लागले. थोड्याच अवधीत पुसाळकरांना झाशीहून आपले बि-हाड हलवावे लागल्याने त्यांना मुंगावलीला परतावे

---

१. काळेले, रा.अ., " तांबे : एक अध्ययन ", प्रथमावृत्ती १९५६, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृष्ठ १२२.

लागले. इकडे तिकडे काही कामे केल्यावर भास्करराव आपल्या कुळाचार कुळचा भिक्षुकीचा व्यवसाय करू लागले. त्यांच्या काव्यात लहानपणी केलेल्या या भिक्षुकीचे अनेक पडसाद उमटलेले दिसतात. भास्कररावांना शिकण्याची इच्छा होती. त्यासाठी ते मुंगावलीहून देवासला आपल्या आजोळी आले. शाळेचे मुख्याध्यापक काशिनाथपंत लेले होते. त्यांनी भास्कररावांना मराठीच्या चवथ्या वर्गात बसविले. पण यावेळी शिक्षणाचा योग नसावा. त्यामुळे एखादी कमावू विद्या शिकण्यासाठी त्यांना उज्जयिनीस पाठविण्यात आले. तेथे भास्कररावांनी उर्दू भाषेचा आणि वकिलीचा अभ्यास सुरू केला. एके दिवशी त्यांनी आपल्या मामाबरोबर त्याच्या अगोदर मॅट्रिक होण्याची पैज लावली आणि ते तडक देवासला आले.

तांब्यांनी १८८९ मध्ये देवास येथील शाळेत पुन्हा प्रवेश घेतला. काशिनाथपंत लेले हे एक जाणकार शिक्षक होते. त्यांनी आपल्या या शिष्यातील गुण अचूक हेरले आणि योग्य दिशेने त्याचा विकास घडवून आणला. त्यांनी संस्कृतातील काव्य आणि साहित्य-ग्रंथांचा आपल्या या शिष्याकडून आस्थापूर्वक अभ्यास करून घेतला. १८९३ मध्ये तांबे मॅट्रिकच्या परीक्षेस बसले आणि पहिल्या वर्गात पास झाले. त्यांना कॉलिजचे शिक्षण घ्यावयाचे होते. पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते अशक्य होऊन बसले. व्यथित हृदयाने त्यांनी शालेय शिक्षणाचा निरोप घेतला.

आता तांबे नोकरी शोधू लागले. पहिले काही दिवस लेले गुरुजींच्या शाळेतच त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. पुढे देवासच्या युवराजांचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. युवराजांच्या बरोबर

त्यांना इंदुरास जावे लागले. नंतर देवासच्या नरेशाचे खासगी सचिव आणि पुढे राजकीय वकील म्हणून ते काम करू लागले. या काळात संस्कृत, इंग्रजी आणि मराठी साहित्याचा अभ्यास करण्यास त्यांना फुरसत मिळाली. पुढील काळात गुदरखेडा येथे राजकीय सल्लागार, पिपलोदा संस्थानचे दिवाण, प्रतापगड संस्थानाचे पोलिस सुपरिंटेन्डेन्ट या नात्याने त्यांनी काम केले. प्रतापगड संस्थानात ते अधूनमधून सरकारी वकील आणि न्यायाधीश म्हणूनही काम करीत. १९२३ त तांब्यांची नेमणूक शिवपूर- बडोदा येथे सुपरिंटेन्डेन्ट म्हणून झाली. तीन वर्षानंतर ग्वाल्हेर राज्याच्या शिक्षण खात्यात रजिस्ट्रार म्हणून तांब्यांची नियुक्ती झाली आणि ते अखेरपर्यन्त या पदावर राहिले.

तांब्यांच्या जीवनात काही व्यक्तींना महत्वाचे स्थान लाभलेले आहे. त्यांच्या मातामही मथुबाई डोंगरे यांनी त्यांच्यावर निरतिशय प्रेम केले. तांब्यांनी आपली " समग्र कविता " या आजीला समर्पण केलेली आहे. लेले गुरुजींनी त्यांना प्रेमाचे आधार दिला नसता, तर त्यांचे आयुष्य कोणीकडे भरकटले असते ते सांगता येत नाही. १८९७ मध्ये रतलाम येथील त्र्यंबकराव जावडेकर यांची कन्या वासूबाई हिच्याशी तांब्यांचा विवाह झाला. तांब्यांची ही पत्नी म्हणजे त्यांची मूर्तिमंत प्रतिभा होती. पत्नीच्या प्रेमात जनन पावलेल्या संदिग्ध गाना तांब्यांनी पत्नीसच अर्पण केल्या आहेत. आपल्या पत्नीवरील प्रेमामुळे आपण प्रेमगीते लिहू शकलो असे त्यांनी निःसंदिग्धपणे सांगून टाकलेले आहे.[१] याच काळात बलभीमबुवा या

---

१. मायदेवांना २३-८-१९२० चे पत्र.

साधु-पुरुषाने त्यांच्या हृदयातील भक्तीची तार छेडली. या बुवांच्या समागमाने त्यांच्या मनातील आस्तिक्यबुध्दी अधिकच बळावत गेली.

देवास ही तांब्यांच्या काव्यगंगेची गंगोत्री. देवासला उगम पावलेली ही काव्यगंगा रतलाम - इंदूर - देवास अशी वळणे घेत धार - उदरखेडा - प्रतापगड अशी वाहते. तेथून ती फिरून पुन्हा इंदूरकडे येते व नंतर अजमेरकडे जाते. आणि नंतर पुढे ग्वाल्हेरात जाऊन शेवटी अनंतास मिळते. या प्रवासात या काव्यगंगेला अनेक लाभदायक गोष्टी प्राप्त होतात. तांब्यांच्या कवितेला रागदारी लाभली ती या प्रवासातच. त्यात हिंदी काव्याशी त्यांचा चांगला परिचय झाला. सूरदास, तुलसीदास यांची पदे तांब्यांना मुखोद्‌गत होती. मीरा, कबीर हे तांब्यांना घरोब्याचे वाटत होते, असे भ.श्री.पंडित सांगतात. १९२०-२२ या काळात तांब्यांनी हिंदी भाषेत भजने रचली होती. रा.अ.काळेले लिहितात, " हिंदी भक्त कवींच्या भजनावरूनच तांब्यानी " नववधू ", " प्रणयप्रभा " यांचे घाट तयार केले. "[१] भ.श्री.पंडितांनीही असेच मत व्यक्त केले आहे. ते सांगतात, " तांब्यांनी गीतगोविंद वाचले होते. परन्तु त्यांना गीतिकाव्य जे स्फुरले ते सूर, कबीर, मीरा व तुलसी यांच्या गीतिकाव्यांवरून स्फुरले. "[२] तांब्यांच्या नाटयगीतात जे मध्यकालीन वातावरण येते, ते वेगवेगळ्या संस्थानिकांच्या पदरी त्यांनी केलेल्या नोकऱ्यांचा परिणाम आहे.

---

१. काळेले रा.अ., " तांबे : एक अध्ययन ", प्रथमावृत्ती १९५६ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृष्ठ ४२.

२. पंडित भ.श्री., " तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य " पहिली आवृत्ती १९७२, व्हीनस प्रकाशन, पुणे , पृष्ठ ७१.

तांबे मोठे भाग्यवान कवी. त्यांच्या काव्याला मायदेव, अज्ञातवासी, डॉ पटवर्धन आणि रा.श्री.जोगांसारखे प्रकाशक लाभले. महाराष्ट्रातील रसिकांनी वऱ्हाडल्यानी त्यांची एकसष्टी साजरी केली. पुण्याला " ज्ञानप्रकाश"ने तांब्यांच्या गौरवार्थ आपला खास अंक प्रकाशित केला. ग्वाल्हेरच्या तांबे वाढदिवस मंडळाने " तांबे : व्यक्ती आणि कला " हा एक दर्जेदार ग्रंथ प्रसिध्द केला. यात तांब्यांचे गद्य लेख असून, प्रो.पराडकर यांनी त्यांचे विस्तृत चरित्र लिहिले आहे. या वाढदिवस मंडळाने यानंतर " तांब्यांचे चरित्र " आणि " तांब्यांचा पत्रव्यवहार " हे दोन महत्त्वाचे ग्रंथ प्रसिध्द केले. ग्वाल्हेरच्या नरेशांनी तांब्यांना " राजकवी " ही पदवी प्रदान करून १०० रुपयांची मासिक नेमणूक करून दिली. त्यांचे शिष्य असलेल्या देवासच्या छोटयापातीच्या बासेसाहेब रांजांनी त्यांना दरमहा ५० रुपयांची नेमणूक करून दिली.

१९२७ मध्ये तांबे " रजिस्ट्रार ऑफ एक्झामिनेशन्स " या ग्वाल्हेरच्या शिक्षण खात्यातून सेवानिवृत्त झाले. तथापि त्यांनी ग्वाल्हेरातील वास्तव्य सोडले नाही. ७ डिसेंबर १९४१ रोजी तांब्यांनी मोठया समाधानाने आपली इहलोकची यात्रा संपविली.

## तांब्यांचा काव्यलेखनकाल -

काळेले यांनी तांब्यांच्या काव्यलेखनाच्या खालील चार अवस्था सांगितल्या आहेत -

१८८९ पर्यंत बीजावस्था.

१८९० ते १९१९ पर्यंत प्रथमावस्था.

१९२० ते १९२९ पर्यंत उत्कर्षावस्था

१९३० ते १९४१ उत्तरावस्था.

तांब्यांच्या कवितालेखनामध्ये अधूनमधून खंड पडलेला दिसतो. त्यांच्या काव्यलतिकेला १९०२ - ३ या वर्षात पहिला बहर आलेला आहे. या दोन वर्षांतील सुमारे चाळीस कविता आज उपलब्ध आहेत. १९१० ते १९१८ आणि १९२९ ते १९३३ या काळात त्यांनी कवितालेखन केल्याचे आढळत नाही. १९३७ ते १९४० या वर्षांतही त्यांनी काव्यलेखन केल्याचे आढळत नाही. १८९५ ते १९०१ या पहिल्या काळात त्यांनी केलेल्या कविता जाळल्याचे दिसते. ते स्वत:च सांगतात, " सरस्वती तेवेला लान्छनास्पद असे जे काही वाटले ते जाळून टाकले. "[1] १९२० मध्ये तांब्यानी काव्यनिर्मितीचा उच्चांक गाठलेला दिसतो. या एका वर्षात त्यांनी ३३ कविता लिहिल्या आहेत. त्याच्या खालोखाल १९३५ त तांब्यांनी ३० कविता लिहिल्या आहेत. तांब्यांची सर्वोत्कृष्ट कविता [ " नोब्लेस्ट ॲाॅज आर्ट इन ऑल माय रायटिंग्ज " - तांबे ] १९२० ते १९२७ या सात वर्षात निर्माण झाली. काळेले म्हणतात, " सात वर्षांच्या या सुवर्णकाळात तांब्यांनी ज्या प्रतीची कविता लिहिली तशी त्यापूर्वी कधीच लिहिली नव्हती आणि नंतरही क्वचित् लिहू शकले. "[2]

---

१. मायदेव वा.गो., "संपादक", भा.रा.तांबे यांची कविता" पुणे १९२०, यातील तांब्याच्या " चार शब्दा"तून.

२. काळेले रा.अ., " तांबे : एक अध्ययन " पृ.१२६.

तांब्यांच्या समग्र कवितेच्या पुस्तकात एकूण २२४ कविता समाविष्ट आहेत. खरे म्हणजे, ही तांब्यांची " समग्र कविता " नसून " उपलब्ध " कविता आहे. कारण त्यांची बरीचशी कविता नष्ट झालेली आहे. सरस्वती सेवेला लांछनास्पद असे जे काही वाटले ते त्यांनी जाळून टाकले आहे आणि जे काही चांगले वाटले ते देखील जपून ठेवण्याची काळजी घेतलेली नाही. तांब्यांच्या या उपलब्ध कवितेमध्ये प्रणयगीतांची संख्या अधिक आहे आणि तोच आपला वर्ण्य विषय आहे.

प्रणयाचे प्राधान्य

" जगात सर्वात सुंदर वस्तु कोणती ? " असा प्रश्न करून श्री. के. क्षीरसागरांनी " सर्वात सुंदर वस्तु प्रेम ही होय ! " असे उत्तर दिले आहे. "[१] भास्कररावांनीही या प्रश्नाला हेच उत्तर दिले असते. कारण त्यांच्या काव्याचा प्रधान सूर प्रणयाचाच आहे. प्रेम हाच त्यांच्या काव्याचा वस्तुत: एकमेव विषय आहे. आपल्या एका पत्रात ते लिहितात, " भक्तीची उत्कटता, एकतानता, मोहिनी ही लक्षणे अगदी अंधुक तरी जेथे उमटू शकतील, अशी एकच भावना मला दिसते, आणि ती स्त्रीपुरुषांतील रतीची ओढ हीच होय. "[२] कलावंताचे वर्णन करताना आपल्या दुसऱ्या एका पत्रात ते म्हणतात, " परन्तु

---

१. क्षीरसागर श्री. के., "साहित्याच्या दरबारात", प्रथमावृत्ती १९६१ सुविचार प्रकाशन मंडळ, पृ. १०७.

२. कविवर्य तांबे, " साहित्य विचार ", पत्र क्रमांक १७ पृ. २२१.

तो तत्त्वज्ञ नाही,.......... तो युक्तिवाद करीत नाही, तो प्रेम करतो. तो प्रेमाच्या डोळ्यांनी पाहत असतो." [ मराठी भाषांतर ][१]. प्रणयाचा सातत्याने संदेश देण्यात आपण सफल झालो आहोत, असेही त्यांनी समाधानपूर्वक म्हटलेले आहे. याच प्रीतीच्या डोळ्यांनी त्यानी आयुष्यभर जीवनाकडेच नव्हे, तर पुढे मृत्यूकडेही पाहिलेले आहे. त्यांच्या काव्याचे " प्रिया हेच सर्वस्व " झालेले आहे. अन्य कशाचीही त्यांनी अपेक्षा बाळगलेली नाही. " मला आळशा पुरे प्रिया आणि ओठांवरली मुरली " असे त्यांनी सांगून टाकले आहे.

## प्रणयाचे विविध रंगढंग

प्रणयातील अनेक सूक्ष्म तरल भावविभ्रमांचे रुचिर प्रत्ययकारी दर्शन हे तांब्यांच्या प्रेमकवितेचे मोठे वैशिष्टय होय. त्यांच्या कवितांमधील प्रेमदर्शनातील विविधता खरोखर लक्षणीय आहे. प्रा. भ. श्री. पंडित सांगतात, " त्यांच्या प्रेमगीतात मनुष्याच्या मानसात क्षणाक्षणाला उठणारे तरल तरंग आणि प्रतिभेच्या आकाशात यदृच्छया उमटणारे , नानाविध रंग आहेत."[२] तांब्यांच्या प्रेमगीतांतील विविधतेचा शोध घेताना वरवर दोन भाग ठळकपणे आढळतात. त्यांच्या काही कविता

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. तत्रैव, पत्र क्रमांक १३, पृ. १८९.
२. पंडित भ. श्री., " आधुनिक कवितेचे प्रणेते " प्रथमावृत्ती १९७१ नागपूर प्रकाशन पृ. ३५९.

आत्मनिष्ठ आहेत आणि काही वस्तुनिष्ठ आहेत. आपल्या पत्नीच्या संबंधाने तांब्यांनी जशा असंख्य कविता लिहिल्या आहेत, तशाच परमनप्रवेश करून अन्य प्रेमिकांच्या प्रेमपूर्ण हृदयाच्या ताराही नाजुकपणे छेडलेल्या आहेत.

तांबे यांचे आत्मनिष्ठ प्रेमकाव्य

तांब्यांच्या बहुतेक प्रेमकवितांचा रोख प्रेयसीपेक्षा पत्नीकडे अधिक आहे. त्यांचे वैवाहिक जीवन सुखासमाधानाचे आणि तृप्ततेचे होते. त्यामुळेच त्यांची बहुसंख्य प्रेमगीते " चारू प्रिया पार्वती "च्या भोवतीच रुंजी घालताना दिसतात. ही प्रियाच त्यांची प्रेरकशक्ती आहे, तीच त्यांची मूर्तिमंत प्रतिभा आहे. त्यांच्या अनेक कवितांत पत्नीवरील त्यांचे अनावर प्रेम उत्कटपणे व्यक्त झालेले आहे. " ठाव न सुखाचा वारा " या कवितेत ते तिला म्हणतात, --

" जिवलगे, सांगि मम सारा
दु:खाचा मात्र पसारा
जुंपलिस सदा संसारा,
ठाव न सुखाचा वारा. "

आपल्या लावण्याचा गर्व मिरवणाऱ्या कोटयवधी युवतींपेक्षा आपली कान्ता अधिक सुंदर आहे अशी कवींची समजूत आहे. आपल्या या प्रियेच्या सौंदर्यावरून लोकांना मोहित करणाऱ्या " शशी, कमलिनी, रत्नांना " ओवाळून टाकण्याची त्यांची तयारी आहे. ते तिला म्हणतात,

" त्वत्प्रेमे कमलास ये कमलता, इंदूस इंदुत्व ये,
रत्ना रत्नपणा, तुझेविण असे निस्सत्त्व सारे प्रिये।"

वास्तवात तांब्यांची पत्नी काळीसावळी होती. परन्तु तांबे बाह्य सौंदर्यावर लुब्ध होणारे पती नव्हते. तिच्या आंतरिक सौंदर्यामुळेच ती त्यांना अधिक सुंदर वाटत होती. " जन म्हणति सावळी " या कवितेत ते म्हणतात —

" जन म्हणति सावळी तुज सगळे.
कस्माई बिचारे ते अंधळे।
नवमीची गे रात्र सावळी.
चंद्रकोर बिजवरा कपाळी,
शालूवरि ता-यांची जाळी,
ज्या मोहवी न त्या काय कळे।

नील कमलिनी माझी सुंदरि,
जन्मजन्मि लाभो मज ती तरि,
केवि बघति मतिमंद पटांतरि,
दृष्टीच जयांची भरे मळे ? "

या दोघांच्या परस्पर प्रेमामुळे कदाचित या दांपत्याची थट्टा होत असावी. " जीवसंयोग " या कवितेत " जन खुळे म्हणति तर अपण खुळे " अशी त्यांनी कबुली दिलेली आहे. पण त्याचबरोबर " त्यांचे अपुले कधि न जुळे " हेही सांगून टाकले आहे. कारण आता त्या दोघांत द्वैतच उरलेले नाही. कमलदलावरील दोन थेंब दल हलल्यानि

आता एकरूप झालेले आहेत -

" कमलदलस्थितजलबिंदू गे,
दल हलले, जुळले ते दोघे,
माझ्या तुझिया या संयोगे
आकृतिया गे बांध गळे. "

तिची सहज हालचालही तांब्यांना मंत्रमोहित करते. तिने त्यांच्याकडे एकवार पाहिले की " संसृतिचा घोर भार " पार विलयाला जात असे. आपली पत्नी म्हणजे साक्षात परमेश्वर आहे, अशी तांब्यांची भावना होती. " सहज तुझी हालचाल "मध्ये ते म्हणतात -

" ही अपूर्व शक्ति सगुण
झाडिते मम अंगण,
हे माझे भाग्य बघुन
जळफळतिल देव ते. "

वेणूत नाद, कवनात सुंदर रस, सुमनात गंध, द्राक्षांत रस, मोत्यामध्ये पाणी आणि सोन्यात जसा मनोहर वर्ण असतो, त्याप्रमाणे त्यांनी आपल्या पत्नीला आपल्या हृदयात साठवून ठेवलेले आहे. " आज पासुनी जिवे अधिक तू माझ्या हृदयाला " असे तीनीसांजच्या वेळेला ते तिला वचन देतात. " सुख तुला ज्यामधे, सुखी तयातच गे मी " असे ते तिला मोकळेपणाने सांगतात. आपल्या सर्वस्वाचे जणू दान्च त्यांनी तिला देऊन टाकले आहे. " सेदिग्ध ताना " या कवितेत ते तिला म्हणतात,

" ताना या जरि पावल्या जनन गे प्रेमी तुझ्याची तरी
घे घे अर्पितसे तुलाच म्हणुनी वारू, प्रिये पार्वती। "

आपल्या प्रियेचे स्वत:च्या हृदयाच्या मुलखावरील साम्राज्य यावज्जीव टिकून राहावे अशी ते परमेश्वराला प्रार्थना करतात.

तांब्यांचा सुखी संसार म्हणजे त्यांनीच सांगितल्याप्रमाणे एक सतार आहे. ते दोघे त्या सतारीच्या तारा आहेत आणि कलानिधी मदन आपले सारे कौशल्य पणाला लावून ती सतार वाजवतो आहे. त्यामुळे वर्षणाऱ्या स्वरसुधेच्या धारांत दोघे न्हाऊन निघाले आहेत. पत्नीच्या केवळ स्पर्शाने तांब्यांना आत्मविस्मरण होते. [ गे शपथ तुझी ]. " माझेपण तुझिया उरि मुरे " असे ते तिला स्पष्टपणे सांगतात. " जीवितसाफल्य " या कवितेत ते म्हणतात,

" युगानुयुग ज्या त्रिभुवनि शोधी निधान ते तव नयनि
मिळाले .
काय भय जरी मरण ये आता विषवृक्षा फल अमृतचि
आले। "

त्यांची परमेश्वराला एकच प्रार्थना आहे,

" आता दीनदयाघना, चरणि रे ही एकची प्रार्थना,
नेता पुण्यमयी प्रिया तिजसवे ने पातकी या जना. "

तांबे आपल्या पत्नीप्रेमात असे गुंग झाले आहेत की, अन्य कुणा स्त्रीचा मोह होण्याचा प्रश्नच त्यांच्या जीवनात कधी उत्पन्न झाला नाही. त्यांच्या मनात अशी कल्पना येणेही अशक्य होते. -

" प्रिया हेच सर्वस्व " या कवितेत ते म्हणतात,

" दुनियेच्या भरल्या बाजारी तुम्हिच करा जा सौदा;
मला फकीरा पुरे प्रिया ही, नको गजाचा हौदा,
एक सखीच्या हृदयि पूर्णता मज लाभे संसारी -
कशास वणवण करू वृथा मी हिंडुनि दारोदारी ?"

तांब्यांच्या या पत्नीविषयक गीतांत त्यांचे अद्वैत, त्यांचे सहसंवेदन, त्यांच्या संसाराची सार्थकता एक उदात्तत्व घेऊन व्यक्त झालेली आहे. त्यामुळे ही गीते अतिशय सरस व सुंदर झाली आहेत. डॉ. मीना जोशी लिहितात, " प्रेमभावनेच्या एवढया तृप्ततेचे दर्शन मराठी कवितेत इतरत्र विरळाच आढळते. म्हणूनच त्यांची ही प्रेमकविता आजवरही अजोड ठरली आहे. निराशा, दारूण दुःख, संशय असल्या प्रतिकूल भावच्छटांना या प्रेमकवितेत जणू प्रवेशच नव्हता. तिच्यात सर्वत्र दिसते ती समाधानी, शांत, तृप्तावस्था! दोन आत्म्यांच्या एकात्मतेची गोड सुरावट। "[१]

## तांब्यांचे वस्तुनिष्ठ प्रेमभावदर्शन

तांब्यांनी केवळ आपल्याच प्रेमाचे नितळ दर्शन घेतलेले नाही. आपल्या प्रेमाचे त्यांनी जसे अंतरंग उकलून दाखविले, त्याचप्रमाणे अन्य स्त्रीपुरुषांच्या मनांतील प्रेमभावाचे कप्पेही उघडून दाखविले आहेत. तांबे परमनप्रवेशाच्या बाबतीत अत्यंत कुशल होते. त्यामुळेच विविध स्तरांतील स्त्रीपुरुषांच्या भावना त्यांना अचूक हेरता आल्या आहेत. या स्त्रीपुरुषांच्या प्रीतिभावाच्या विविध छटा त्यांच्या

---

१. डॉ.सौ.जोशी मीना, "निरीक्षा", प्रथमावृत्ती १९७८, सुपर्ण प्रकाशन पुणे, पृ.१२३-१२४.

कवितेत व्यक्त झालेल्या दिसतात. या कारणाने तांब्यांची नाटयगीते मोठी सरस आणि मोहक झालेली आहेत.

तांबे यांच्या प्रतिभेच्या ठिकाणी परमनप्रवेशाचे असलेले अपूर्व सामर्थ्य त्यांच्या अनेक नाटयगीतांत आढळते. त्यांची प्रतिभा जणू एकाच वेळी काव्यप्रतिभा आणि नाटयप्रतिभा होती. त्यांनी आपल्या वेगवेगळया भूमिकांना बोलते तर केलेच, पण ते अशाप्रकारे बोलते केले की त्या त्या मनोभूमिकेचा झोकनोक, तिचा रंगढंग, तिचा आगळेपणा तिच्या बोलण्यातून मूर्तिमान व्हावा. तांबे आपल्या प्रेमामध्ये तृप्त असल्यामुळेच दुस-यांच्या प्रेमभावनेकडेही तितक्याच निकोप कौतुकाच्या दृष्टीने पाहू शकतात. आपल्या पात्रांच्या प्रणय जीवनातील गुपिते, त्यांची मोहक वंचना, त्यांची अधीरता, प्रतिक्षा, हुरहूर, उत्कंठा यांचे वर्णन करताना ते हर्षनिर्भर होऊन जातात. आपल्या प्रेमी-प्रेमिकांच्या अंत:करणातील प्रणयाचे मधुर पडसाद त्यांना सहजासहजी ऐकू येतात आणि त्यांची प्रेमचेष्टिते ते सूक्ष्म नजरेने टिपतात. त्यांची प्रणयविषयक नाटयगीते यशस्वी होतात ती यामुळेच होय. प्रा.कृ.ब.निकुम्ब लिहितात,
" प्रेमविषयक भावगीतांतील तृप्ती तांबे यांच्या प्रेमविषयक नाटय-गीतांतही पुरेपूर उतरली आहे; मात्र तिचा येथील विलास अधिक खेळकर वाटतो. भावगीतांत ते उत्फुल्ल असले, तरी गंभीर [ सिरीयस ] असतात. नाटयगीतांतील प्रसन्नतेवर मात्र हव्याहव्याशा वाटणा-या मिस्किलपणाचा गुलाबी रंग असतो."[१]

---

१. प्रा.निकुम्ब कृ.ब., " पारख ", प्रथमावृत्ती,१९७३, नवसाहित्य प्रकाशन, पृ.१४९.

अ ] विधवाविषयक प्रेमगीते

तांब्यांची विधवांवरील गीते ही उघडपणे सामाजिकगीते नाहीत. वस्तुस्थितीने ती तरूण विधवांच्या अंत:करणातील प्रीतीची गीते आहेत. या विधवांचे प्रेमही एका जातीचे नाही. त्यांच्या प्रीतील वेगवेगळया आणि सूक्ष्म अशा अनेक छटा आहेत. " विधवेचे स्वप्न " या कवितेत आपल्या मृत पतीच्या सहवासाच्या कल्पनेतच तल्लीन असलेली विधवा दिसते, तर " नि:शब्द आत्मयज्ञ " या कवितेतील विधवेच्या मनात तिच्या मनाविरूध्दच दुस-या व्यक्ती-विषयीच्या भावना रूजू लागतात. पण काहीशा निग्रहाने ती नि:शब्द आत्मयज्ञाचेच प्रस्थान मांडते. " बघुनि तया मज होय कसेसे" या कवितेतील विधवा दुस-या व्यक्तीसंबंधीच्या आपल्या मोहाची कबुली देऊनही हा मोह योग्य नव्हे असे मानणारी आहे. " हिंदू विधवेचे मन " मधील विधवा परक्या पुरूषाबद्दलची आसक्ती प्रत्यक्ष त्याच्यासमोरच कबूल करूनही त्याच्याशी विवाह करावयास मात्र तयार होत नाही. ती त्याला म्हणते,

" बहिण होइन, दासी होइन,
भक्त होऊनी चरणा पूजिन
तुमच्या वाटा केशी झाडिन
अधिक पत्निपणि काय कृपाळा ?
बोल न बोला एकहि यावर,
धैर्यचि ढासळतील डोंगर,
भलते जाइल निघोनि उत्तर.
भागिदार नच व्हा नरकाला । "

आपल्या या कृपाळाला एखादा " श्रेयस्कर कर " मिळावा अशी ती देवाला विनंती करते आहे. "चरणाखालिल हाय मीच रज " या गीतातील विधवा समाजातील आपल्या दुरवस्थेबद्दल तक्रार करताना दिसते. पण तांब्यांच्या कवितेत अशीही एक विधवा भेटते की, जी आपल्या प्रेमापुढे समाजाची कोणतीही पत्रास बाळगावयास तयार नाही " ते कान्त यापुढे मीहि तयांची कान्ता " असा आपला ठाम निर्धार ती व्यक्त करते आहे. कधी मनात प्रेमाचा विचारच येऊ द्यावयाचा नाही, कधी प्रेमपत्राच्या दोन ओळी लिहिल्यावर स्वत:चे बोट जाळून घेऊन प्रायश्चित्त घ्यायचे, कधी निग्रहाने प्रेमभाव दाबून टाकावयाचा, कधी वेगळे नाते जोडण्याचा प्रयत्न करायचा, तर कधी समाजाविरुद्ध बंडखोरी पुकारायची -- अशा प्रेमाच्या वेगवेगळया छटा या विधवांच्या गीतांत व्यक्त झालेल्या आहेत. मराठीतील प्रेमगीतांत तांब्यांच्या विधवा-गीतांचे विशिष्ट स्थान आहे. काळेले लिहितात, " तांब्यांची विधवा-गीते म्हणजे त्यांच्या प्रेमगीतांच्या पूर्णचंद्रावरील कारुण्याची कमनीय कलंकशोभाच होय. "[१]

ब ] स्त्रियांचे प्रेमचित्रण

ब्राउनिंगप्रमाणे तांबे स्त्री-पुरुषांचे कवी आहेत. स्त्री-पुरुषांच्या विविध भावनांना तोंड फोडण्यात व त्यांची गुंतागुंत हळुवार हाताने उलगडण्यात त्यांना कमालीचे यश लाभले आहे. त्यांची स्त्रियांवरील

---

१. काळेले रा.अ., " तांबे : एक अध्ययन ", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ. ८३.

गीते संख्येने अधिक आहेत व ती अधिक मोहकही आहेत. तांब्यांच्या स्त्रीभूमिकेवरून लिहिलेल्या गीतांत " डोळे हे जुल्मि ", " दृष्ट हिला लागली ", " बिजलि जशी चमके ", " वाटेच्या वाटसरा ", " ते दूध तुझ्या त्या घटातले ", " आज तो कुठे जिवाचा-चोर " इत्यादी गीते विशेष सरस झालेली आहेत. या सर्व गीतांत तांबे यांनी केलेले स्त्रीमनाचे चित्रण अत्यंत वेधक झालेले आहे. या गीतांतून तांबे आपल्यापुढे एकएक भावनाट्य उलगडत जातात आणि त्या भावनाट्याशी आपणही मग समरस होत राहतो.

तांब्यांनी प्रेमात हरवलेल्या किंवा प्रेमाने हरवलेल्या स्त्रियांच्या प्रतिमा बऱ्याच कवितांत रेखाटल्या आहेत. " दृष्ट हिला लागली " या कवितेतील नायिका कुणाच्या तरी प्रेमामुळे हरवलेली आहे. " घट भरे प्रवाही बुडबुडुनी ", " घट तिचा रिकामा " यांतील नायिका प्रेमात बुडाल्याने हरवलेल्या आहेत. " ते दूध तुझ्या त्या घटातले " मधील " ती ". स्वप्नभूमीत हरवली आहे. " सत्प्रीतिमार्ग " या कवितेतील प्रेमात हरवलेली ती " भयाण अवसरी निजवल्लभ शोधार्थ " चाललेली आहे. कवी चपला आणि घन यांना प्रणयी जनांना भिववू नका, असे सांगून म्हणतो,

" रोधू नका सत्प्रीतिमार्ग, व्हा दूर तुम्ही झडकरी।
काय कळेना, तुम्हा जगी या काय प्रीति न करी ?"

" मुशाफिर आम्ही " या कवितेतील ती मुशाफिराने वारंवार धोक्याची जाणीव करून दिली तरी, त्याच्या वारमागून धावताना आपणांस दिसते. चहुकडे ढगाच्या माळा असताना दरडीवर उभी

राहून " दरडीवरील बाला " आपल्या प्रीतिमूर्तीची प्रतीक्षा करते आहे. " का उभी तू तरी ? " ची नायिका कुणी चिटपाखरू नसलेल्या जागी कुठल्यातरी भ्रांतीत पडून उभी राहिलेली दिसते. पहाटचा तारा गगनी आला असता एक नायिका लगबग करून कुणीकडे तरी निघाली आहे. " ये पहाटचा तारा गगनी " या कवितेच्या नायिकेला कवी विचारतो,

" मिळेल का त्या वनी खरोखर
या समयि सोबती तुला कुणी ? "

" कोठे मुली जासि ? "तील 'ती' राक्षसी वेळी एकलीच कुठेतरी चालली आहे. " कवणे मुलखा जाशी ? " च्या नायिकेचीही अशीच स्थिती आहे. तांब्यांच्या अनेक कवितांत अशा हरवलेल्या स्त्रिया भेटतात. " घट " ही कल्पना आलेल्या कवितांतील स्त्रिया प्राय: हरवलेल्या आहेत.

स्त्रियांच्या या प्रणयविलसितांमध्ये कवी कधी प्रेमीस्त्रियांना धोक्याची जाणीव करून देतो, तर कधी त्यांना सहाय करतो. झऱ्यावर रिकामा घट टाकून " ती " आपल्या प्रियकराच्या मीलनासाठी पलीकडील वेळूच्या जाळीत गेली आहे हे त्याला माहीत असते, पण तो उगीचच कापणी करणाऱ्या स्त्रियांच्या थव्यात त्या "भ्रमरी"चा शोध घेतो. वटपूजन करणाऱ्या बायकांत त्या " रतिमंजरीला " हुडकू लागतो, आपली ही " फिरकणी " शिवालयात शोधू लागतो. तिच्या रहस्याला कवी अशी मदत करीत राहतो. तांब्यांनी आपल्या कवितांत अशी विविध स्त्रीचित्रे रेखाटली आहेत.

" वाटेच्या वाटसरा"त विवाहपूर्व प्रियकराच्या आगमनाने आपल्या संसाराच्या भरल्या ताटात विष कालवले जाईल या भीतीने त्रस्त झालेल्या स्त्रीचे केवढे सूक्ष्म आणि गुंतागुंतीचे भावनाट्य अगदी थोड्या शब्दांत तांब्यांनी व्यक्त केले आहे। बाळपणी दिलेल्या शब्दाची " गोष्ट लांब गेली " असे म्हणत असतानाच ती पुढील जन्मासाठी त्याला शब्द देऊन बसते, पण भरलेल्या ताटात विष कालवू नको असेही विनविते. तिला सगळेच सांभाळावे लागत आहे. आपल्या पतीच्या पराक्रमाचे भूषण मिरविणारी, प्रियकरावर लटके रागावणारी, त्याच्यावर मत्सराची आग पाखडणारी, पतीच्या त्यागानंतर विरक्त जीवन कंठणारी, भावाच्या खट्याळ चेष्टांनी त्याच्याशी गट्टी फू करणारी, चरणी लोळविण्यासाठी तरुणाचा शोध घेणारी जादूगारिणी, सोक्षमोक्ष करून घेण्याची भाषा करणारी अवमानिता अशी अनेक स्त्रीचित्रे तांब्यांनी रेखाटली आहेत. या प्रेमचित्रांत राग, रुसवा, चीड, पराधीनता, आत्मवंचना, प्रसन्नता, निर्धार, अगतिकता, बंडखोरी अशा अनेक भावच्छटा व्यक्त झाल्या आहेत.

क] <u>प्रणयी पुरुषांचे चित्रण</u>

या स्त्रीचित्राप्रमाणे पुरुषांच्या प्रेमवृत्तीचीही तेवढीच हृद्य चित्रे तांब्यांच्या नाट्यगीतांतून चित्रित झालेली आहेत. " वायो कुणम तीस " या कवितेमधील निराशप्रेम, " ते कोण या ठायि " या कवितेतील अबोध प्रेमस्मृती, " हे पिसे सोड " असे किती सांगितले तरी तरुणास लागलेली दिव्यांगनेची ओढ, " पन्नास वर्षांनंतर " आपल्या प्रेयसीचीच जणू प्रतिकृती अशी नात पाहून हृदय खळबळून आलेल्या विधुराचे

उद्गार ही सर्वच पुरुषप्रेमाची अत्यंत हृदयस्पर्शी अशी चित्रे आहेत. तांब्यांच्या नाटयगीतांत क्रुध्द सुंदरीचा रुसवा काढणारा कुशल प्रियकर भेटतो, तत्त्वज्ञान्यांना प्रेमाचे माहात्म्य कसचे कळणार म्हणून त्यांची संभावना करणारा प्रेमीपुरुष आढळतो, मुखाने देवाचे नाव घेणारा, पण डोळे मात्र समोरच्या खिडकीकडे रोखणारा ढोंगी जोगी दिसतो, आजोबा म्हणून हाक मारली जाण्याने व्यथित झालेला जरठ वर भेटतो आणि विधवेवर कृपाळू झालेला एक प्रेमिकही दिसून येतो.

" प्रणयवंचिताचे उद्गार " या कवितेतील प्रेमीपुरुष आपल्या वेडया मनाला दटावीत म्हणतो, --

" तुज खेळ वाटली प्रीति मना रे वेडया,
हो अता तरी खातरी ? जाशि वाटे त्या ?"

" फसवणूक " या कवितेतील प्रेमिकास कवी आपली वेडी आशा सोडून " दुसरी मंजरी " पाहण्याचा सल्ला देतो आहे. तो त्याला म्हणतो की, तुझे ते लुसलुसले पाखरू दुसऱ्याच्या जाळयात फसले आहे. तेव्हा --

" अभागि पांथा, चुकशी पंथा लाग अता मार्गास
जा जा ! दुसरी पहा मंजरी, सजव तुझ्या हृदयास "

" आठवती ते दिन अजुनी " या कवितेतील प्रियकर डोळयांतून अश्रू गाळीत भरल्या उराने म्हणतो,

" हा धिग् जीवन ! मृत्युच हे दिन आले भाळी मम कुठुनी ?"

तांब्यांच्या कवितेत मुशाफिर आहे, फेरीवाला आहे. असे अनेक प्राप्तप्रेम आणि प्रेमविध्द पुरूष तांब्यांच्या कवितांतून आढळतात. तांब्यांच्या या पुरूषप्रेमाच्या चित्रणाच्या बाबतीत प्र.रा.श्री.जोग लिहितात, " म्हाता-या नवरदेवाची थोडी गंमत जरी तांबे यांनी केलेली असली तरी, कोणाच्याही योग्य प्रेमभावनेची अनुदार अशी थट्टा त्यांनी केली नाही. "[१]

ड] तांबे यांच्या संवादात्मक कविता

तांबे यांच्या संवादात्मक कविताही नाटयगीतेच आहेत. परन्तु भास्कररावांच्या काव्यविशेषांत त्यांच्या या संवादकाव्यांना महत्त्वाचे स्थान असल्याने त्यांचा पृथक् विचार केलेला आहे. प्र. वसंत बापट यांनी म्हटल्याप्रमाणे, " संवादकाव्य हा नाटयात्म कवितेचा एक लक्षणीय आणि विरळ प्रकार आहे. "[२] " राजकन्या आणि तिची दासी " हे तांब्यांचे सरस सुंदर संवादकाव्य मराठीमध्ये एका अभिनव प्रकाराचा पाया घालणारे आहे. प्रीतिभावनेची जी अनंत रूपे भास्कररावांनी पाहिली आणि चित्रित केली त्यांतील हे एक आगळे रूप आहे. एका मुग्धेच्या जीवनात एकाएकी कुणी सौदागर येऊन एक जबरदस्त ओढ निर्माण करतो, घरच्यांच्या धाकामुळे तिच्या मनाचा कोंडमारा होतो, तिची चतुर मैत्रीण हे ओळखते आणि शेवटी

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. जोग रा.श्री., संपादक " प्रणयप्रभा ", पुनर्मुद्रण ऑगस्ट १९७५, व्हीनस प्रकाशन पुणे, पृ.२३.

२. ढवळे वा.रा. संपादक " मधुघट: रसदर्शन ", राजकन्या आणि तिची दासी, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, पृ.२७.

कलाटणी देणारा गौप्यस्फोट करते. अशी खुबीदार कहाणी या कवितेत आटोपशीरपणे आली आहे. मैत्रीण राजकन्येला " उगिच बसोनी कावाऱ्याला कान कधी देता ?" असे विचारते. यावर दोघींत संवाद होतो तो असा,

" कधि ग दिला कुणि कान ? कुणाला कधि ग भास झाला ?"
" कळेल कैसं देउनि चुकता हृदयचि दुसऱ्याला ?"
" घे घे सटवे, आळ घेशि तर भलता मजवरती । "
जा म्हण, बसलं मन त्यावर, चल निघ येथुनि परती ।"

यावर ती राजकन्येला विचारते,

" खैरपूरच्या गुणवयरूपे योग्यकुमाराला
राणाजी ते देता म्हणता " ना " का मग त्याला ?"

आणि मग एकूण कहाणीला कलाटणी देणारा दोघींत असा संवाद होतो,

" खैरपूर किति धनाढ्य । त्यांना योग्य आम्ही का गं ?"
" कंवराणीजी, किती लपविता मन ? किति ही सोंगं ?"
किति भोळ्या तुम्हि । खैरपुरेशचि ते, न व्यापारी,
वेष पालटुनि आले इकडिल बघण्या ही स्वारी."
" काय पुन्हा ते खैर -तेच-च्या-का-कुंवरजी ते ?"
" मी खोटी, मी सटवी लुच्ची ? उर का धडधडते ?"

" मुशाफिर आम्ही ", " अहो धन्वंतरी ", " माळीण ", " जमादार ", " वियोगिनी " या तांब्यांच्या काव्यसंवादात्मक अशा कविता आहेत. " मुशाफिर आम्ही " या कवितेत मुशाफिर रजपुत

बालेला विचारतो, " आम्ही वनवासी, कशास्तव भुललीस आम्हांसी ? " आणि ती सांगते, " तुमचि हो मरली, मरली मूर्ति मनी " तो तिची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न करतो. तो सांगतो

" जिवाला धोका,
धोका रानात नीट हे आणी ध्यानात "

यावर ती म्हणते,

" तुम्हांविण जगणे,
जगणे मृत्यूच की तयाहुनि दुस्सह या लोकी ।"

" अहो धन्वंतरी" या कवितेत विरहज्वराने तापलेल्या एका विरहिणीला धन्वंतरी वेगवेगळे उपाय सुचवितो. फुलांची शेज, वाळ्याची उटी, चांदण्यातील विहार, मधाचे अनुपान यांसारखे उपाय सांगतो. यावर ती म्हणते,

" त्या निदान हो ज्या मनिचे गुज जाणवे
प्रणय-पंडिता, तुम्हां आणखी काय सांगणे बरे ? "

हा संवाद ऐकून कवी मिस्किलपणे विचारतात -

" रसिका, सांगा कसली मात्रा मिळता रोग न उरे ? "

या संवादात्मक काव्यांत तांब्यांनी सुरेख वातावरणनिर्मिती केली आहे. मध्ययुगीन वातावरणात तांब्यांनी आपल्या या नायकनायिकांना उभे केले आहे. ही वातावरणनिर्मिती करताना

तांब्यांचा वेगवेगळया संस्थानात केलेल्या नोकरीचा अनुभव उपयोगी पडला आहे.

## तांबे यांची मधुराभक्ती

तांब्यांची ईश्वरावर असीम श्रध्दा होती. किंबहुना त्यांच्या जीवनात आत्मतृप्तीचे जे दर्शन घडते त्याच्या बुडाशी ही आस्तिक्य-बुध्दीही आहे. त्यांनी या परमेश्वरी कृपेवर उघडपणे आणि क्वचित् शृंगाराच्या अवगुंठनातून कविता लिहिलेल्या आहेत. भक्ताने परमेश्वरास प्रियकर अथवा रमणी कल्पिणे ही प्रथा अनेक काव्यग्रंथांत पुरातन काळापासून असलेली दिसून येते. कबीर स्वत:स " रामकी बहुरिया " म्हणवून घेतो, तर सूफी कवी स्वत: प्रियकर बनून परमेश्वररूपी रमणीवर प्रेम करीत असतो. तांब्यांच्या कित्येक कविता ही मधुराभक्ती व्यक्त करून जातात. प्रिं. ताटके यांच्या मते तांब्यांच्या काव्यातील शृंगार दिसतो तसा तो नाही. असल्या कवितांत पूर्ण अध्यात्म भरलेले असते.[१] शृंगाराच्याद्वारा भक्तिभावना योग्य रीतीने प्रकट करता येते असा स्वत: तांब्यांचाही अभिप्राय आहे. ते म्हणतात, " परमात्मा आणि भक्त यांच्या अनन्य प्रेमास जगात तोड नाही. ही अत्यंत गूढ भावना, हे उभयतांचे ऐक्य अवर्णनीय होय, अनिर्वचनीय होय. त्याला तोंड कसे फोडता येईल ? ............ भक्तीची किंचित् छाया ज्यात पडू शकेल अशी एकच भावना रतीची होय, व तिचा आश्रय करून या गूढ भावनेला कवी प्रकट करीत आले आहेत. "[२]

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. काळेले, रा.अ., " तांबे: एक अध्ययन " पृ.८४.

२. तांबे यांचे दि. ७-८-१९३४ चे डॉ.श्रीखंडे यांना पत्र.

तांब्यांच्या " आले तुझ्या रे दारी नृपा ", " नववधू, प्रिया मी ", " रे अजात अज्ञात सखे जन।", " या वेळी माझ्या रे रमणा।", " घातली एकदा अता उडी ", " स्वारी कशी येईल ?", " कळा ज्या लागल्या जीवा " इत्यादी कवितांत या मधुराभक्तीचे दर्शन घडते. कविवर्य तांब्यांच्या विशेष गाजलेल्या भावगीतांमध्ये " नववधू, प्रिया मी " हे एक आहे. येथील नववधू आपल्या ईश्वररूप पतीकडे, सासरी जायला निघाली आहे. परन्तु ऐहिकाच्या लळ्यामुळे तिच्या वृत्ती बावरून गेलेल्या आहेत. आपल्या प्रियाला ती म्हणते,

" जीव मनीच्या मनी तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळे
पळत निघावे तुजजवळ पळे -
परि काय करु ? उरि भरभरते. "

" यावेळी माझ्या रे रमणा " या कवितेने अध्यात्म जीवनातील एक विशिष्ट क्षण टिपलेला आहे. भक्ताचे मन ऐहिकापासून अलिप्त झाले आहे. सांसारिक जाणिवांचे पुसट स्पर्शही एकामागून एक निरसले गेले आहेत. परमेश्वर मीलनाला उचित अशी एकाग्रता साधली गेली आहे. परस्पर भेटीला हा क्षण उचित असल्यामुळे येथील प्रिया आपल्या रमणाला लगबग करावयास सांगते,

" कानोसा मी घेता थकले,
तुझी न ऐकू येति पाउले
का मग मजला वेड लाविले ?
किति विलंब करिशिल आगमना ?"

तांब्यांच्या वर उल्लेखिलेल्या सर्व कवितांत भक्त तांब्यांची ईश्वरावरील ही प्रीतीच व्यक्त झालेली आहे.

## तांबे यांच्या कवितांतील शृंगाररस

तांबे यांच्या कवितांतील शृंगार रसाचा कधी कधी अधिक बाऊ केला जातो, तो बरोबर नाही. तांब्यांच्या गीतांतील ज्या रसास शृंगार हे नाव दिले जाते तो नीट पारखून घेतला पाहिजे. तांब्यांनी आपल्या काव्यात जो ध्वज उंच धरला आहे, तो स्मराचा मीनध्वज नसून, प्रीतीचा ध्वज आहे. त्यामुळेच कै. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनी तांब्यांना " शृंगारमधुमत्तमिलिन्द " असे जे म्हटले आहे, त्याचा फेरविचार करावा लागतो. ज्या शृंगाराची तुलना मादक मद्याशी करता येईल असा शृंगार तांब्यांच्या कवितेत नाही. तांब्यांनी अशा काही कविता आपल्या पूर्ववयात लिहिलेल्या असतीलही, पण त्या शृंगारिक आहेत हे ध्यानात घेऊन आपल्या हातानेच त्यांनी त्या जाळून टाकलेल्या आहेत. तांब्यांच्या उपलब्ध कवितांत मादक शृंगार मुळीच नाही. काही समीक्षक तांब्यांना " कौटुंबिक अथवा गृहस्थाश्रमी कवी " असे म्हणतात. प्रा. पारसनीस यांनी तांब्यांना हे बिरूद चिकटविले आहे. प्रा. भ. श्री. पंडितही लिहितात, " तांब्यांच्या पत्नीविषयक एकंदर प्रेमगीतांचा विचार केला तर, त्यांत संस्कृत शृंगारापेक्षा आणि इंग्रजी प्रणयापेक्षा विशुध्द प्रेमभावनेची मात्रा अधिक आढळेल. त्यांच्या या प्रेमगीताला वैवाहिक किंवा कौटुंबिक गीते हे नाव अन्वर्थक ठरेल. "[१] माझ्या मते तांब्यांना " शृंगारमधुमत्तमिलिन्द "

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. प्रा. पंडित भ. श्री., " तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य", आवृत्ती पहिली, १९७२, व्हीनस प्रकाशन पुणे, पृ. ७८.

म्हणणे जसे चुकीचे तसेच त्याना कौटुंबिक अथवा गृहस्थाश्रमी कवी असे मानणेही चुकीचे होय. तांब्यांच्या कवितेत संस्कृत काव्यातील मधुमत्त शृंगार नाही, फारशी काव्याच्या इराणी चषकातील शृंगाराची धुंद शराब नाही आणि सामान्य हिंदू कुटुंबात आढळणारे सामान्य प्रेमही नाही. तांब्यांचे आपल्या पत्नीवरील प्रेम असावर उत्कट असे होते. त्यांनी हे प्रेम ज्या पध्दतीत जगले, भोगले आहे आणि प्रकट केले आहे ते सामान्य कुटुंबात आढळेल असे मला वाटत नाही. कदाचित् तांब्यांच्या या प्रेमाची टिंगल झाली असावी, आणि त्यामुळेच त्यांना,

> जन खुळे म्हणति तर अपण खुळे।
> त्यांचे अपुले कधि न जुळे। [ जीवसंयोग ]

असे म्हणण्याचा प्रसंग आला असावा. तांब्यांच्या कवितेत मत्त शृंगाररस आहे असे म्हणण्यापेक्षा तीत आरपार " प्रेमरस " भरला आहे असे म्हणणे वास्तवाला धरून होईल. तांब्यांचा हा प्रेमरस साऱ्या विश्वाला स्पर्श करताना आढळून येतो. हा या प्रेमरसाचा विशेष होय.

भास्कररावांचा हा प्रेमरस लक्षात येण्याच्या दृष्टीने या त्यांच्या प्रेमरसाचे काही पैलू लक्षात घेतले पाहिजेत. हे विविध पैलू त्यांच्या पत्नीविषयक प्रेमगीतांत जसे प्रकट झाले आहेत, तसेच ते अन्य प्रेमगीतांतही व्यक्त झाले आहेत.

## आन्तरिक प्रीतीची ओढ

भास्कररावांची प्रेमवृत्ती बाह्यसौंदर्याचे महत्त्व अमान्य करीत नसली, तरी तिची खरी ओढ आंतरिक सौंदर्याकडेच आहे. बाह्यसौंदर्यावर भास्करराव भुलणारे नाहीत. " तू जिवलगे विद्यावती जाणती " या कवितेत ते म्हणतात,

" नाही ज्या सुमनी मधू, न घिरट्या घे भृंग गुंगोनिया,
सौंदर्यातिशये खुलो, परिमळे व्यापूनि टाको वन;
नाही प्रीति अशा सुरम्य नयनी गुंते न माझे मन,
सौंदर्यातिशये खुलो, जन भुलो, त्यालागि पाहोनिया. "

तांबे मानवी जीवनात " मधूला " अर्थात गुणातिशयाला महत्त्व देतात. तांब्यांचा हा दृष्टिकोन लक्षात येण्याच्या दृष्टीने त्यांची " जन म्हणति सावळी " ही कविता अतिशय महत्त्वाची आहे. आपल्या पत्नीला सावळी म्हणणा-या लोकांना ते "कस्माई बिचारे आंधळे " असे म्हणतात. या लोकांची पटांतरी बघण्याची म्हणजे हृदय जाणण्याची कुवतच नाही, असे ते सांगतात —

" नील कमलिनी माझी सुंदरि,
जन्मजन्मि लाभो मज ती तरि,
केवि बघति मतिमंद पटांतरि,
दृष्टीच ज्यांची भरे मळे ? "

तांबे कुभावनेने विटाळलेल्या मनापेक्षा मरण अधिक बरे मानतात. " दे पूर्ण हृदय सुंदरी " या कवितेत ते म्हणतात,

" कुभावनेने विटाळता मन
प्रीती जाइल पळून तेथुन,
विषमय होइल जीवन त्याहुन
मरण बरे किति तरी। "

भास्कररावांची कविता अशा आंतरिक प्रीतीचा सोस बाळगणारी आहे. तांब्यांची स्त्रीप्रेमाची कल्पना शारीरिक आकर्षणाच्या पलीकडे गेलेली आहे. या शारीरिक आकर्षणाचा धिक्कार करीत ते म्हणतात,

" पापाची स्मृति राहिली जर नरा पाहूनि ही सुंदरी,
धिक् धिक्! त्या कळली अगाध हरिची नाहीच कारागिरी। "

## तांब्यांच्या कवितेतील शारीरिकता

तांब्यांच्या कवितेत शारीरिकतेचा संपूर्ण अभाव आहे, अगदीच खडखडाट आहे, असे मात्र नाही. " आठवती ते दिन अजुनी " या कवितेतील विरही पुरुषाला ज्या दिवसांची आठवण होते त्यात शारीरिकतेच्या ब-याच छटा आहेत. तो म्हणतो,

" मृदुमधु बोलुनि नेली यामिनी जागत कामिनी, ये स्मरणी.
करि कर घालुनि अधिकचि अवळुनि तृप्त न झालो जे स्वमनी
कोमल अधरी दाबुनि अधरा जेव्हा रमलो सुखसदनी
लीलावति ती सुदती युवती स्मृति ती करिते स्थिर नयनी "

" समज मानिनी!" या कवितेतील नायकही नायिकेला " अमृतमधुर

रसपान हवे तरि अधररसाचे दानच करि गे." असे सांगतो. कुणाच्या तरी स्मृतीत किंवा प्रेमात हरपिलेल्या तांब्यांच्या स्त्रियांचा पदर प्राय: गळालेला असतो —

" पदर गळाला, उडे वायुवर
कुरळे उडती केसहि भुरभुर," [ घट भरे प्रवाही बुडबुडुनी ]
" वायुची बसे थाप ती, चिरगुटे उडति,
केस भुरभुरति, का चढली दरडीवरती "
[ दरडीवरील बाला ]
" वायु झरझरा आळवि सुस्वर, ओढि तुझ्या पदराशी "
[ कपणे मुलखा जाशी ? ]

" दृष्ट हिला लागली " या कवितेत तथाकथित दृष्ट लागलेल्या मुग्धेचे वर्णन करताना कवी सांगतात —

" चाफ्याफ्यापरी गोरेपण पिवळं,
काकडीपरि अंग कोवळं,
मैदापरि लुसलुशीत सगळं
दृष्ट पडुनि करपली । "

तांब्यांच्या गीतांत संस्कृत साहित्यातील शृंगारिक कवितेप्रमाणे स्त्रीच्या अंगप्रत्यंगांचे आलंकारिक वर्णन नाही. मात्र त्यांच्या अनेक गीतांत डोळ्यांचा निर्देश येतो. " डोळे हे जुलमि गडे ", " मिळे गे नयना नयन जरी ", " जेव्हा लोचन हे तुझे विहरती या माझिया लोचनी ", " स्थिरावले हे लोचन, पडली भुरळ बघुनि

तव नयना ", " निधान ते तव नयनि मिळाले ", " सखिलोचनकासारी", " अगाध दुर्मिळ जनी । दिसे मज काहि तुझ्या लोचनी ", " तव नयनि उजळले बालरवी " इत्यादी उल्लेखातून हे स्पष्ट होते.

श्री. काळे यांनी " संस्कृत साहित्यातील बहुतेक संकेत तांब्यांनी पाळलेले दिसतात " असे म्हटलेले आहे.[1] तांब्यांच्या शृंगारिक वर्णनात काही जुने संकेत आलेले आहेत हे खरे आहे. प्रियेच्या तनुस्पर्शापुढे चंद्राची किरणसुधा फिकी वाटणे, प्रेमिकांच्या गोष्टीपेक्षा रात्रीची लांबी कमी भरणे, प्रियेच्या प्रेमरोगावर प्रियकराची भेट हेच औषध असणे, प्रियकराने वेष पालटून प्रियेची भेट घेणे, वर्षाकाळी विरही जिवाचे उत्कंठित होणे, विरहामध्ये कोकिलकूजित आणि चंद्रदर्शन तापदायक होणे असे पारंपरिक संकेत तांब्यांच्या गीतांत येतात. तथापि काळे यांनी धृष्ट नायक, अनुकूल नायक, विप्रलब्धा नायिका खंडिता नायिका असा संस्कृत चतुर्विध नायकांचा आणि अष्टनायिकांचा तांब्यांच्या गीतांत शोध घेण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तो मात्र अस्थानी वाटतो.

<u>तांब्यांच्या प्रेमगीतातील मिस्किल आणि मुग्ध शृंगार</u>

तांब्यांच्या शृंगारिक गीतांत काही ठिकाणी मिस्किलपणा आढळून येतो. " दृष्ट हिला लागली । " या कवितेत ते वर्णन करतात,

" लिंबलोण ग कोणी उतरा.
जगदंबेचा ग अंगारा

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. काळे रा.अ., "तांबे : एक अध्ययन ", पृ. ६३.

लावर, बांधा गंडादोरा
काळजि घ्या चांगली।
करकरीत तीनीसांजा ही
देवदर्शना एकलि जाई,
वा-यापरि ही अचपळ बाई
दृष्टे कुणि पाहिली। "

हा मिस्किलपणा " फेरीवाला " या कवितेतही सापडतो. कारण त्याच्या फे-या घालण्यामागचा उद्देश काही वेगळाच असतो. या कवितेत कंवराणीजीला मिस्किलपणे सांगितले आहे,

" फे-या दारावरी कुणी हा फेरीवाला करी ?
प्रभातकाळी दीपविसर्जनि,
सायंकाळी दीपदर्शनी.
पुकार करिता खिडकीवरूनी
नजर फेकितो वरी.
कंवराणीजी, गोखडयातुनी
जरा बघा तर हळुच ढुंकुनी,
हवा तरी घ्या बुरखा ओढुनि,
नजर चळो ना परी. "

" जमादार ", " अहो धन्वंतरी " यांसारख्या कवितांतही याच मिस्किलपणाचा प्रत्यय येतो.

तांब्यांच्या कवितेत मुग्धशृंगाराची काही चित्रे आली आहेत. " कुणी कोडे माझे उकलिल का ? " ही कविता त्याचे सुरेख उदाहरण होय.

" कुणि कोडे माझे उकलिल का ?
  कुणि शास्त्री रहस्य कळविल का ?"

असा प्रश्न करून कोडे घातले आहे ---

" गुलाब माझ्या हृदयी फुलला,
  रंग तुझ्या गालांवर खुलला,
  काटा माझ्या पायी रुतला
    शूल तुझ्या उरि कोमल का ?
  मद्याचा मी प्यालो प्याला,
  प्रिये तयाचा मद तुज आला,
  कुणी जखडिले दोन जिवांला
    मंत्रबंधनी केवळ ? का ? "

" प्रणयप्रभा " या कवितेतही याच मुग्ध प्रणयाचे चित्र आलेले आहे. येथे प्रियेला म्हटले गेले आहे --

" तव नयनि उजळले बालरवी,
  फुले हृदयि मम उषश्छबी,
  हृत्क्षितिजी मम कनकमनोरम
  राग उसळला उधळुनि कुंकुम,
  तिळभर न उरे कोठेही तम,
    न्हाले बाग सखे, विभवी. "

प्रेमगीतामध्ये तांब्यांच्या प्रतिभेने अनेक जागी कल्पकतेचा मोठा विलास साधला आहे. " हृदय सांग चोरिले कशास सुंदरी ?"

ही संपूर्ण कविता याचे सुंदर उदाहरण ठरेल. एका सुंदरीला येथील प्रेमिक म्हणतो आहे,

" हृदय सांग चोरिले कशास सुंदरी ?
देऽ! दे न देशि तरी दे तुझे तरी । "

हा प्रेमी मदननृपापासून न्याय मागून घेणारा आहे. इतकेच नव्हे, तर मदनाचा मंत्री असलेल्या चंद्रम्याकडून आणि वसंत कोतवालाकडून तिला सजाही करविणार आहे. तो तिला म्हणतो,

" नयनि धूळ घातली
गुंतवोनि कुंतली,
दडविले तिथूनिही हळूच का उरी ?
मदननृपापासुनी
दाद घेइ लावुनी
वसुनि लोचनांत तुझ्या न्याय जो करी.
मदनमंत्रि चंद्रमा
न्यायबळे कांतिमान्
अनलधार ओतवीन मी तया करी.
वसंत कोतवाल हा
सज्ज गे उभा पहा।
कुसुमबाण सोडवीन मी तुझ्या उरी. "

तांब्यांच्या प्रेमाभिव्यक्तीत प्रणयाच्या अशा विविध छटा आढळतात. ते कधी कल्पनेने प्रेमाचे चित्र उभे करतात, कधी प्रेमातील मिस्किलपणाचा आविष्कार करतात, तर कधी रसिकांच्या हृदयाला गुदगुल्या करणारी

मुग्ध प्रीतीची चित्रे रंगवितात.

## तांब्यांची सफल आणि विफल प्रीतीची चित्रे

भास्कररावांच्या सफल आणि विफल प्रीतीचा उल्लेख आणि उदाहरणे यापूर्वी आलेलीच आहेत. परन्तु याबाबतीत काही समीक्षकांनी मांडलेल्या विचाराची पाहणी करण्यासाठी आणि तांब्यांच्या प्रेमगीतातील विविधता ठळकपणे दाखवून देण्यासाठी या मुद्याचा अलग विचार येथे करण्यात येत आहे.

तांब्यांच्या कवितेत प्राय: सर्वत्र सफलतेचेच साम्राज्य आहे. त्यांच्या कवितांत तृप्तीचे अथांग समाधान आहे. प्रेमतृप्तीच्या विविध छटा तांब्यांनी उत्कटतेने व्यक्त केल्या आहेत. आपल्या पत्नीशी तर त्यांचे अद्वैतच प्रस्थापित झाले आहे. कमलपत्रावरील पूर्वी अलग असलेले हे दोन जळबिंदू प्रणयाच्या वाऱ्याने एकमेकात मिसळून गेलेले आहेत. तिचा सावळेपणा येथे " अगाध सुंदर " झालेला आहे. दोघांच्या अद्वैतमीलनाचा उत्कटक्षण " मग विसर हवा तर हा क्षण गे " या कवितेत तांब्यांनी टिपलेला आहे. " सहज तुझी हालचाल " ही कविता म्हणजे तर तांब्यांच्या परिपूर्ण आत्मतृप्तीचे निश्वसितच आहे. तांब्यांच्या या प्रेममीलनात ब्रह्मानंदसहोदर असा आनंद सामावलेला आहे.

तांबे आपल्या पत्नीप्रेमात असे कृतार्थ आणि आत्मतृप्त असल्यामुळे त्याना दुसऱ्यांच्या प्रीतीतही याच साफल्याचे दर्शन अधिकतेने होते. अशी सफल प्रीतीची असंख्य चित्रे आपल्या नाट्यगीतांत

त्यांनी रेखाटलेली आहेत. स्त्रीपुरुष प्रीतीत अडथळा येऊ नये असेच ते मनोमन इच्छितांना दिसतात. " सत्प्रीतिमार्ग " या कवितेतील प्रिया भयंकर वृष्टीमध्ये प्रियकरास भेटावयास निघालेली आहे. विजांचा कडकडाट होतो आहे, विद्युत्पातांनी वृक्ष दुभंगून पडत आहेत, झरे त्वेषाने फोफावत वाहत आहेत. अशा भयंकर मध्यरात्रीच्यावेळी ती झपाझप पावले टाकीत विपिनांतरी चालली आहे. वाघ, काटे, सर्प यांची तिला मुळीच तमा नाही. निजवल्लभशोधार्थ निघालेल्या या तरुणीचा मार्ग अडविला जाऊ नये असे कवीला वाटते. तो वीज आणि मेघ यांना प्रणयी जनाला भिववू नका असे सांगतो आणि म्हणतो,

" रोधु नका सत्प्रीतिमार्ग, व्हा दूर तुम्ही झडकरी !
काय कळेना तुम्हां जगी या काय प्रीति न करी ? "

तांबे दुस-यांच्या प्रेममीलनात हर्षनिर्भर होताना दिसतात. प्रेमिकांना मदत करण्यात ते कसे तत्पर असतात याचा निर्देश आपण पूर्वीच केलेला आहे.

तांब्यांनी प्रीतीतील विफलतेचेही चित्रण केलेले आहे. तांब्यांच्या काही प्रेमगीतांत विफलतेची जी चित्रे येतात, त्याबद्दल प्रा. कु. ब. निकुम्ब लिहितात -- " प्रत्यक्ष जीवनात सफलता होती म्हणून कदाचित् स्वप्नरंजनात विफलतेची चित्रे पाहण्याचा कलावंताला शोभण्याजोगा चाळा त्यांनी करून पाहिला असावा. बोलून चालून हा स्वप्नाळूपणाच असल्यामुळे प्रत्यक्षातील वातावरण या कवितांत आले नाही. "[१] प्रा. निकुम्ब तांब्यांच्या विफल प्रीतीच्या गीतांना

---

१. प्रा. निकुम्ब कु. ब., "पारख", प्रथमावृत्ती १९७३, नवसाहित्य प्रकाशन, पृ. १४८.

स्वप्नाळू प्रीतीचा एक प्रकारचा चाळा समजतात. मला तसे वाटत नाही. " पन्नास वर्षांनंतर ", " वाटेच्या वाटसरा " यांसारख्या तांब्यांच्या कवितांना कोणी स्वप्नाळूपणातील चाळा मानेल असे मला वाटत नाही. या कविता वाचकाच्या हृदयाला हात घालणाऱ्या आहेत. प्रा.रा.श्री.जोग लिहितात, " स्वतःच्या प्रेमतृप्तीच्या धुंदीत इतरांच्या प्रेमनिराशेबद्दल सहानुभूतीचा अभाव त्यांनी कधी प्रकट केलेला नाही. सफल प्रेमाइतकेच विफल प्रेमाच्या दर्शनाने त्यांचे मन आकृष्ट होई."[१]

मानवी जीवनात प्रीतीच्या सफलतेचा जसा अनुभव येतो, तसाच तिच्या विफलतेचाही अनुभव येत राहतो. तांबे विफल प्रीतीचे चित्रण करून मानवी जीवनातील या वास्तवतेला स्पर्श करीत आहेत असे मला वाटते.

## प्रेमभावनेचे साधारणीकरण

तांब्यांच्या प्रेमकवितांतील प्रेमभावना ही व्यापक स्वरूपाची आहे. ती जशी त्यांच्या स्वतःच्या पत्नीबद्दलची आहे, तशीच अन्य स्त्री-पुरुषांमधीलही आहे. तथापि पत्नीबद्दलची काय किंवा अन्य स्त्रीपुरुषांमधील काय, ही प्रेमभावना खाजगी स्वरूपाची राहात नाही. तिचे साधारणीकरण होते आणि त्यामुळेच ती कुणाही रसिकास हृद्य व आस्वाद्य वाटते. परस्परांवर अनुरक्त असलेल्या दांपत्यास तांब्यांच्या पत्नीविषयक प्रेमगीतांत स्वतःचेच प्रतिबिंब आढळेल. तांब्यांनी आपल्या प्रेमगीतांत प्रेमाच्या अशा काही विविध छटा व्यक्त केल्या आहेत, की

---

१. प्रा.जोग रा.श्री., संपादक, " प्रणयप्रभा" पृ.२०

त्यांतील एक किंवा अधिक छटांशी आपला साक्षात् संबंध जुळावा. स्थान आणि साधने बदलली तरी प्रेमभावना ही चिरंतन स्वरूपाची आहे. आज नदीवरून घट भरभरून आणण्याची आवश्यकता राहिली नसेल, नदीच्या ऐवजी नळावर पाणी भरावे लागत असेल. तथापि प्रेमात हरविले जाण्याचे रहस्य हे शाश्वतस्वरूपी आहे. आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थिनी तांब्यांच्या नायिकाप्रमाणेच निर्भर बनून प्रेमात हरवू शकतात. तांब्यांच्या कवितांत रूसवा, फुगवा, तृप्ती, वंचना, चीड, पूर्वस्मृती, प्रेमनिर्भरता यांसारख्या ज्या गोष्टी आढळतात त्या सार्वकालीन आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रेमभावनेचे साधारणीकरण होणे सहज शक्य होते. तांब्यांनी मधुराभक्तीचा जो धागा पकडलेला आहे तो सरळ वेदकाळापासून लांबत आलेला आहे. सश्रध्द मनाला मोठा दिलासा देण्याची शक्ती तांब्यांच्या मधुरा-भक्तीपर गीतांत आहे. तांबे यांची प्रेमभावना अशी सर्वस्पर्शी आहे आणि या कारणानेच तांब्यांची कविता सर्वांना आवडणारी आहे. प्रेमभावनेचे हे साधारणीकरणच त्यांच्या लोकप्रियतेला मोठे कारणीभूत झालेले आहे. डॉ. सौ. आशा सावदेकर सांगतात, " तांब्यांच्या काव्यातील प्रेम एकाच वेळी लौकिक असते, अलौकिकही असते, आत्मनिष्ठ असते, तितकेच सर्वसाधारणही असते. "[१]

येथपर्यन्त आपण तांब्यांच्या प्रेमभावनेचे अधिकाधिक बाजूने निरीक्षण केले. प्रीती ही त्यांच्या जीवनातीलच नव्हे तर कवितेतीलही

---

१. डॉ. सौ. आशा सावदेकर, कविवर्य भा. रा. तांबे: एक चिकित्सक अभ्यास, प्रथमावृत्ती १९७९, शान्ती प्रकाशन, नागपूर पृ. १९.

सार्वभौम भावना आहे. स्त्रीपुरुषांमधील प्रीतिभावनेबद्दल तांब्यांना मोठे कुतूहल आणि अतोनात आकर्षण आहे. या भावनेकडे बघण्याची तांब्यांची दृष्टी संपूर्णतः निरोगी आहे. तिच्या मानसिक बाजू इतकेच तिच्या शारीर आविष्काराचेही त्याना महत्त्व वाटते. शान्ता शेळके लिहितात, " प्रीतीचा शेवट आत्मिक एकरूपतेत होत असला तरी तिचा प्रारंभ शारीरिक आकर्षणातून होतो, याचा तांब्यांना कधी विसर पडत नाही. त्याप्रमाणेच या शारीरिक आकर्षणाबद्दल तदनुषंगिक वासनाविकारांबद्दल त्यांच्या कवितेत कधी ओशाळगतीची, क्षमायाचनेची वृत्तीही दिसून येत नाही...... तथापि, स्त्री-पुरुषांमधील शारीरिक आकर्षणाबद्दल संपूर्णतः जागृत असलेल्या तांब्यांच्या कवितेचे त्या शारीरिक मीलनाशी संगत होऊन येणाऱ्या आत्मिक ऐक्याचेही भान कधी सुटत नाही. "[१]

तांब्यांच्या गीतिकाव्यात सर्व प्रेमवृत्तींचा सहज आविष्कार झाला आहे. त्यांच्या नाट्यगीतांतील पात्रांचे स्वभावही अनेकविध आहेत. पात्रांची आणि प्रेमवृत्तींची विविधता हा त्यांच्या कवितांचा ठळक विशेष आहे. जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अतिशय निकोप आहे.

" अपूर्व सुंदर नाटक हे जग
मांगल्याचे आगर सौभग "

---

१. ढवळे वा. रा., संपादक, " मधुघट : रसदर्शन ", तीनी सांजा सखे मिळाल्या, पृ. १०-११.

अशा निर्मळ दृष्टीने ते जगाकडे पाहतात. आणि त्यामुळेच प्रेमवृत्तीतल्या अनेकविध छटा त्यांना टिपता येतात. तांब्यांच्या कवितेत राजकीय प्रचार नाही किंवा सामाजिक क्रांतीची घोषणाही नाही. पण जीवनातील उदात्त भागाचे सर्वत्र निदर्शन मात्र नक्की आहे. प्रा. श्री. के. क्षीरसागर म्हणतात, " सामान्य भावनांचे उदात्तीकरण आणि उदात्त भावनांचे उद्दीपन यांचा व्यक्तींच्या आणि समाजाच्या उत्कर्षाशी जर जिव्हाळ्याचा संबंध असेल, तर तांब्यांसारखे हे कवी समाजाचे प्राणच होय. "[१]

निष्कर्ष -

१] तांब्यांची कविता त्यांच्या जीवनाच्या सोबतीने विकसित झाली आहे. त्यांच्या जीवनाची त्यांच्या कवितेवर स्पष्ट छाप उमटलेली आहे.

२] तांब्यांच्या काव्यलेखनाच्या चार अवस्था मानता येतात. त्यांच्या काव्यलेखनात वारंवार खंड पडलेला दिसतो. १९२० या वर्षात त्यांनी ३३ कविता, तर १९३५ त ३० कविता लिहिल्या आहेत. १९२० ते १९२७ ही सात वर्षे म्हणजे त्यांच्या काव्यलेखनाचा सुवर्णकाल होय.

३] तांब्यांच्या कवितेत प्रणयाचे प्राधान्य आहे. प्रणय हीच त्यांच्या कवितेची सार्वभौम भावना आहे. त्यांनी प्रणयावर

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१., क्षीरसागर श्री. के., "व्यक्ती आणि वाङ्‌मय " प्रथमावृत्ती १९३७ य. गो. जोशी प्रकाशन, पृ. ४८.

पन्नासहून अधिक कविता लिहिलेल्या आहेत.

४] तांब्यांच्या पत्नीविषयक कविता मोठया हृद्य अशा आहेत. पतिपत्नीतील अद्वैताचे सुरेख चित्र या कवितांत उमटलेले आहे. आपल्या जीवनसंगिनीविषयी प्रेमळ पतीच्या कोणत्या आणि किती भावना असू शकतात याचा एक आलेख या कवितांत आपणांसमोर येतो. ही " वारू-प्रिया-पार्वती " त्यांच्या काव्याची खरी प्रेरणा आहे, तीच त्यांची प्रतिभा आहे.

५] तांबे यांनी स्त्री-पुरूषांतील प्रेमभावनेचा आविष्कार करणारी अनेक नाटयगीते लिहिलेली आहेत. विविध स्वभावांचे स्त्री-पुरूष या नाटयगीतांत आपणांस भेटतात.

६] तांब्यांनी विधवांच्या प्रेमभावनांचे मनोज्ञ चित्रण केलेले आहे. या विधवांच्या वृत्ती वेगवेगळया आहेत आणि त्या अनुषंगाने त्यांची प्रेमभावना कधी अस्फुट तर कधी स्फुट रूपात व्यक्त झालेली आहे.

७] तांब्यांच्या स्त्रीप्रेमाच्या चित्रणात मोठी विविधता आहे. त्यात प्रेमाने किंवा प्रेमामध्ये हरविल्या गेलेल्या स्त्रिया अधिक आहेत. स्त्रियांच्या विविध मनोवस्थांची चित्रे रेखाटण्यात तांब्यांनी मोठी कुशलता व्यक्त केलेली आहे.

८] तांबे ब्राउनिंगप्रमाणेच स्त्री-पुरूषांचे कवी आहेत. स्त्रियांच्याप्रमाणेच त्यांनी पुरूषांच्या हृदयातील प्रेमाची हळुवार स्पंदने उकलून दाखविलेली आहेत. " पन्नास वर्षांनंतर " ही त्यांची कविता रसिकांच्या हृदयात हात घालणारी आहे.

९] संवादकाव्य हा नाटयात्म कवितेचा एक लक्षणीय आणि विरळ प्रकार आहे. तांब्यांच्या काव्यविशेषांत त्यांच्या संवादकाव्याला महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे " राजकन्या आणि तिची दासी " हे मराठीमध्ये एका अभिनव प्रकाराचे पाया घालणारे संवादकाव्य आहे. तांब्यांनी लिहिलेली संवादकाव्ये रसिकांचे रंजन जशी करतात त्याचप्रमाणे प्रेमवृत्तीतील खेळकरपणा व्यक्त करतात.

१०] आस्तिक्यबुध्दी हा तांब्यांचा एक ठळक असा विशेष होय. ते सश्रध्द होते. मृत्यू म्हणजे जीवाशिवांचे मीलन होय, अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यांनी हे मीलन शृंगाराच्या अवगुंठनातून व्यक्त केले आहे. मधुराभक्तिपर त्यांची गीते सरस ठरलेली आहेत.

११] तांब्यांच्या प्रेमकवितेत शारीरिकतेपासून ते मुक्तीपर्यंतच्या अनेक अवस्था व्यक्त होतात. त्यांच्या प्रेमगीतांत साफल्य अधिक आढळले, तरी वैफल्याचा अभाव नाही. त्यांच्या प्रणयाविष्कारात शारीरिकता, मिष्किलपणा, आणि मुग्धशृंगार आढळला तरी त्यांची ओढ आंतरिक प्रीतीकडेच अधिक असलेली दिसते. त्यांनी प्रीतीवर यज्ञाच्या ज्योतीचे रूपक केले आहे, हे विसरता येत नाही. त्यांची प्रेमवृत्ती निकोप आणि सर्वस्पर्शी असल्यामुळे प्रेमातील मांगल्याचा अंशच त्यांच्या प्रेमकवितांत आधिक्याने आढळून येतो.

१२] तांब्यांची प्रेमवृत्ती खाजगी स्वरूपाची राहात नाही. त्यांच्या प्रेमगीतांतील प्रेमभावनेमध्ये साधारणीकरणाची क्षमता आढळते आणि त्यामुळेच त्यांची प्रेमगीते रसिकांच्या हृदयाला स्पर्श करतात.

==०==०==